क्र.साप्र/५/कावि/४४५/ २०२२
विभागीय आयुक्त कार्यालय
विधान भवन, पुणे विभाग.
(सामान्य प्रशासन विभाग)
दिनांक :- २६/१२/२०२२

विषय- स्थानिक सुट्टया -२०२३ जाहीर करण्याबाबत

आदेश

शासन, राजनैतिक सेवा विभाग, निर्णय क्र.पी-१३-२ बी, दि.१६-०१-१९५८ व शासन, सामान्य प्रशासन विभाग अधिसुचना क्र.सावैसु-स्था-१०८३-१७७१-(६४)-८४-२९, दिनांक १४-०३-१९८३ अन्वये प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन मी, सौरभ राव, विभागीय आयुक्त, पुणे विभाग पुणे सन २०२३ या वर्षासाठी पुणे जिल्हयामधील महाराष्ट्र शासनाच्या सर्व कार्यालयांसाठी खालील दिवस सुट्टयांचे दिवस म्हणुन जाहीर करीत आहे.

| अ.क्र. | दिनांक | वार | सन २०२३ मधील स्थानिक सुट्ट्या |
|---|---|---|---|
| १. | २२ सप्टेंबर, २०२३ | शुक्रवार | गौरीपूजन |
| २. | १० नोव्हेंबर, २०२३ | शुक्रवार | धनत्रयोदशी |
| ३. | ०८ डिसेंबर, २०२३ | शुक्रवार | आळंदी यात्रा |

**मा.विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांच्या मान्यतेने**

**सही/-**
**(वर्षा लड्डा-उंटवाल)**
**उपायुक्त (सामान्य प्रशासन)**
**पुणे विभाग पुणे**

**प्रति,**

पुणे जिल्हयातील सर्व विभाग प्रमुख / प्रादेशिक व जिल्हा प्रमुख यांचेकडे माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

त्यांनी त्यांचे प्रशासकीय नियंत्रणाखाली पुणे जिल्हयातील सर्व दुय्यम कार्यालयांना उपरोक्त सुट्टया कळवाव्यात.

**प्रत-** माहिती उपसंचालक, पुणे विभाग, मध्यवर्ती इमारत, पुणे -०१ यांचेकडे माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

उपरोक्त स्थानिक सुट्टयांना स्थानिक वर्तमानपत्रे, आकाशवाणी व दुरदर्शनवर बातमी या सदरात प्रसिध्दी देण्याची व्यवस्था करावी अशी विनंती आहे.

**प्रत-** १. मंत्रालयीन सर्व विभागांचे सचिव.
२. मा.आयुक्त महानगरपालिका, पुणे, पिंपरी-चिंचवड, सांगली-मिरज कुपवाड, सोलापूर, कोल्हापूर, इचलकरंजी
३. मा.जिल्हाधिकारी पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर.
४. मुख्य कार्यकारी अधिकारी , जिल्हा परिषद, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर.
५. पुणे विभागातील सर्व नगरपरिषदांचे मुख्याधिकारी.
६. आयुक्त कार्यालयातील सर्व शाखाधिकारी, स्वीय सहाय्यक.

**(वर्षा लड्डा-उंटवाल)**
**उपायुक्त (सामान्य प्रशासन)**
**पुणे विभाग पुणे**